**पत्र** जा.क्र.तृधावि/विप्र१/निक्षेबि/मा.सू/५४१२/ /२०१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५, **दिनांक : /४/२०१२**

**प्रति,**

**१) विभागीय कृषि सह संचालक, (सर्व)**
**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

**विषयः- सन २०१२-१३ च्या कृती आराखडयाअंतर्गत निवडक गावांत बियाणे उत्पादन कार्यक्रम मार्गदर्शक** सूचना

केंद्र पुरस्कृत '' निवडक गावांत बियाणे उत्पादन कार्यक्रम '' अंतर्गत गळीतधान्य व कडधान्य या पिकांचे मुलभूत बियाणे खरेदी व तृणधान्य पिकांचे पायाभूत बियाणे उत्पादन कार्यक्रम या बाबी राज्यातील शासकीय तालुका बिज गुणन केंद्रावर राबविण्यासाठी मंजुरी मिळालेली आहे.

ज्वारी, बाजरी, नागली या पिकासाठी रुपये ४००/- प्रति क्विंटल प्रमाणे व भात, गहू पिकासाठी रुपये २००/- प्रति क्विंटल प्रमाणे उत्पादित बियाण्यास अनुदान देय असलेला एकुण रक्कम रुपये १०.०० लाखाचा कार्यक्रम केंद्र शासनाकडे मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

**सोबत-वरीलप्रमाणे**

**कृषि संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-५**

**प्रतः- माहितीस्तव सविनय सादर.**

**१)** मा.प्रधान सचिव, कृषि पशंसुवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई ३२
**२)** मा. मंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक.
**३)** मा. राज्यमंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक

**प्रतः- माहितीस्तव सस्नेह अग्रेषित**

**४)** कृषि संचालक (सर्व)
**५)** मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि औद्योगिक विकास महामंडळ,
राजन हाऊस, तिसरा मजला, प्रभादेवी, मुंबई २५.
**६)** मा. व्यवस्थापकीय संचालक ,मार्केटींग फेडरेशन मुंबई
**७)** व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, प्लॉट-८, शास्त्रीनगर, अकोला
**८)** मा. व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय बीज निगम, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ३७.
**९)** संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
**१०)** संशोधन संचालक,डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.
**११)** संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी.
**१२)** संशोधन संचालक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

http://mahaagri.gov.in/

१३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघुद्योग विकास महामंडळ, मुंबई.

**प्रतः- सहपत्रासह माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.**

१) कृषि उपसंचालक, आयुक्त कक्ष, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

२) कृषि माहिती अधिकारी, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
आवश्यक त्या प्रसिध्दीसाठी

३) कृषि उपसंचालक (नियोजन), कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे-५

**कृषि संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, म.रा.पुणे - ४११००५.**

http://mahaagri.gov.in/

## निवडक गावांत बियाणे उत्पादन कार्यक्रम २०१२-१३ मार्गदर्शक सूचना

सन २०१२-१३ मध्ये जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त तालुका बीज गुणन केंद्रावर बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात यावा.

**सदर योजने अंतर्गत राबवावयाच्या बाबी खालील प्रमाणे आहेत.**

❖ **अ) मुलभूत बियाणे खरेदी -**

सदर योजनेअंतर्गत गळीतधान्य व कडधान्य पिकांच्या मुलभूत बियाणे खरेदी किंमतीच्या १०० टक्के अनुदान देय आहे. तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावर पायाभूत बियाणे उत्पादनासाठी आवश्यक असलेले गळीतधान्य व कडधान्य पिकांच्या अधिसूचित वाणाचे मुलभूत बियाणे कृषि विद्यापीठे व भारतीय कृषि अनुसंधान संस्थेच्या संशोधन केंद्रावरुन खरेदी करण्यात यावे. मुलभूत बियाणे खरेदी केल्याच्या देयकासह प्रस्ताव खरीप २०/८/२०१२, रब्बी १५/१२/२०१२, उन्हाळी २५/२/२०१३ पूर्वी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास पाठवावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सादर केलेल्या देयकाची छाननी केल्यानंतर खरेदी किंमतीच्या १०० टक्के अनुदानाची रक्कम तालुका बीज गुणन केंद्रास अदा करण्यात यावी.

❖ **ब) तालुका बीज गुणन केंद्रावर पायाभूत बियाणे उत्पादन कार्यक्रम**

पुढील वर्षासाठी शेतक-यांची मागणी असलेल्या ज्वारी, बाजरी, नागली तसेच भात व गहू या तृणधान्य पिकांच्या वाणाचा बियाणे उत्पादन कार्यक्रम जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या गरजेप्रमाणे निश्चित करावा आणि त्यानुसार बियाणे उत्पादन कार्यक्रम घ्यावा.

या योजनेअंतर्गत तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावरील ज्वारी, बाजरी, नागली आणि रागी या पिकाचे पायाभूत बियाणे उत्पादनाकरिता प्रति क्विंटल रुपये ४००/- अनुदान देय आहे. तसेच भात व गहू या पिकासाठी रुपये २००/- प्रति क्विंटल अनुदान देय आहे. तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावरील उत्पादीत केलेल्या पायाभूत बियाणाचा अंतिम अहवाल बीज प्रमाणीकरण यंत्रणेने अंतिम प्रमाणित केलेल्या पायाभूत बियाणाच्या अहवालासह जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास खरीपचा डिसेंबर अखेरपर्यत व रब्बीचा फेब्रुवारी अखेरपर्यत सादर करावेत. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी विभागीय कृषि सहसंचालक यांना अहवाल सादर करावेत. विभागीय कृषि सहसंचालक यांनी आयुक्तालयास सादर करावेत.

➢ **१) बिजोत्पादनासाठी बियाणे उपलब्धता :**

१) बिजोत्पादनसाठी आवश्यक पायाभूत बियाणे प्रत्यक्ष क्षेत्र विचारात घेऊन बियाणेची मागणी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि विद्यापीठ अथवा महाबीज यांचेकडे नोंदवावी.

२) सदरचे बियाणे वेळेत उपलब्ध होईल याबाबत योग्य दक्षता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी घ्यावी.

➢ **२) बिजोत्पादन प्लॉटची नोंदणी :**

बिजोत्पादन क्षेत्राची जिल्हा बीज प्रमाणीकरण यंत्रणा यांचेकडे नोंदणी करण्यात यावी. क्षेत्र तपासणी जिल्हा बीज प्रमाणीकरण यंत्रणा यांचेकडून करण्यात यावी. तपासणी अहवाल अभिलेख म्हणून संबंधित ता.बी.कें. वर राखुन ठेवावेत.

http://mahaagri.gov.in/

➢ **३) निरिक्षणे :**

१) बिजोत्पादन क्षेत्रावर पीक वाढीच्या कालावधीत क्षेत्रात आढळून येणारी भेसळ वेळच्या वेळी काढून टाकावी.
२) उच्च प्रतीचे बियाणे उत्पादनासाठी बिजोत्पादन क्षेत्र तणविरहित ठेवावे.
३) बिजोत्पादन प्लॉटला शिफारशीप्रमाणे खते व पाणी देणे आवश्यक आहे.

➢ **४) बिजोत्पादनासाठी घेतलेल्या वाणांचे भौतिक गुणधर्म -**

या कार्यक्रमा अंतर्गत बिजोत्पादनासाठी निवडलेल्या वाणांचे भौतिक गुणधर्म संबंधित पिक पैदासकार/बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडून प्राप्त करुन घ्यावेत व ज्या अधिका-यावर क्षेत्र तपासणी करण्याची जबाबदारी देण्यांत आलेली आहे त्यांना याबाबत प्रशिक्षित करावे. बियाणांत प्रमाणापेक्षा जास्त भेसळ आढळल्यास त्याची जबाबदारी त्या अधिका-यांवर राहील याची त्यांना पूर्ण कल्पना द्यावी.

➢ **५) उत्पादित बियाण्याची बीज प्रक्रिया :**

बिजोत्पादन कार्यक्रमाअंतर्गत उत्पादित झालेल्या बियाण्याची प्रक्रिया करणे. यामध्ये बियाणे वाळविणे, स्वच्छ करणे, प्रतवारी करणे, उगवण क्षमता चाचणी तपासून घेणे व पिशव्या भरुन मोहरबंद करणे, लेबल लावणे इत्यादि बाबींचा अंतर्भाव आहे.

निवडक क्षेत्रात बियाणे उत्पादन कार्यक्रम सन २०१२-१३

| अ.क्र. | बाब | अनुदानाचे प्रमाण | भोतिक (क्विंटल) | आर्थिक (रु.लाख) |
|---|---|---|---|---|
| | | | लक्ष्य | लक्ष्य |
| १ | मूलभूत बियाणे खरेदी | खरेदीची पूर्ण रक्कम गळीतधान्य व कडधान्य पिकासाठी | -- | ४.०० |
| २ | पायाभुत बियाणेचा बिजोत्पादन कार्यक्रम | अ) रुपये ४००/- प्रति क्विंटल ज्वारी, बाजरी, नागली, रागी | ७०० | २.८० |
| | | ब) रुपये २००/- प्रति क्विं भात, गहू | १,६०० | ३.२० |
| | एकूण | | | १०.०० |

http://mahaagri.gov.in/